ePaper


## सातार्‍यानंतर नवी मुंबईत शरद पवारांची भर पावसात सभा



| वर्ष - 7 | अंक - 199 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 28 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- धावांच्या शर्यतीत गोलंदाजांची कमाल!
- 'पिंगा गं पोरी' वर ओरी जान्हवीचा डान्स
- चंद्रशेखर राव सत्ता राखणार?
- अबब... तब्बल सात कोटींचा अश्व!

# पाणी कपातीचे संकट!

## पवना धरण परिसरात पुरेसा पाऊस न पडल्याचा परिणाम

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुरेसा पाऊस न पडल्याने पवना धरणातील पाण्याचा साठा 88 टक्क्यांवर आला आहे. ऐन नोव्हेंबरच्या मध्यातच धरणातील पाणीसाठा घटला आहे. पाण्याची वाढती मागणी पाहता हा पाणीसाठा मे महिन्याच्या अखेरपर्यंत पुरेल, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. परिणामी शहरवासियांवर पाणी कपातीचे संकट निर्माण झाल्याचे चित्र आहे.**



जून महिन्यापासून धरण परिसरात दोन हजार 833 मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. पवना धरणातून दररोज 510 दशलक्ष लिटर (एमएलडी) अशुद्ध जलउपसा केला जातो. धरणापासून नदी पात्रातून आलेले पाणी रावेत येथील बंधाऱ्यातून उचलले जाते. तेथून पाणी जलवाहिन्यांद्वारे निगडी-प्राधिकरण सेक्टर 23 मधील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी नेले जाते. त्यावर प्रक्रिया करून शहराला पाणीपुरवठा होतो. सध्या 25 नोव्हेंबर 2019 पासून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे.

समान प्रमाणात सर्वांना पुरेसे पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाने दोन भागात विभाजन केले आहे. त्यामुळे एकाच दिवशी संपूर्ण शहराला 510 एमएलडी पाणीपुरवठा करण्याऐवजी निम्मे शहरालाच तेवढे पाणी दिले जात आहे. त्यामुळे शिवाय, एमआयडीसीकडून दररोज 30 एमएलडी पाणी घेतले जात आहे. तसेच, आंद्रा धरणातून दररोज 50 एमएलडी पाणी शहराला मिळत आहे.

> गतवर्षी नोव्हेंबर महिन्यापर्यंत 90.38 टक्के धरणात पाणी साठा होता. यावर्षी ही स्थिती 88 टक्क्यांवर आली आहे. पाणी पुरवठ्याची मागणी सध्या आहे तेवढीच राहिली तर पाणी कमी पडण्याची शक्यता आहे. एप्रिल किंवा मे 2024 पर्यंतच पाणी पुरेल अशी स्थिती येईल. मात्र पाण्याची मागणी कमी झाल्यास पाणी साठा पुढील पावसाळ्यापर्यंत पुरेसा होईल.
>
> **-रजनीश बारिया, शाखा अभियंता, पवना धरण.**

---

# पर्यावरण जागृतीसाठी पुणे ते कन्याकुमारी ‘सायकल वारी’!

## सायकलपटू जितीन इंगवले यांची मोहीम : भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले कौतूक

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**आपण प्रगती साधत असताना, आपल्याकडून कळत-नकळत निसर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. प्रदूषणाची पातळी सातत्याने वाढत असताना, झाडांची कत्तल केली जाते. आगामी काळात स्वच्छ हवेचा प्रश्न गंभीर होणार आहे. पर्यावरणाचे सरंक्षण करावे, याची जनजागृती करण्यासाठी सायकलपटू जितीन इंगवले यांनी ‘पुणे ते कान्याकुमारी सायकल मोहिम’ यशस्वी केली.**



पिंपरी-चिंचवडमधील सायकलपटू जितीन इंगवले व त्यांच्या ११ सहकाऱ्यांनी ‘पर्यावरण’ या संदर्भात जनजागृती व्हावी, या उद्देश्याने दि. १६ ते २५ नोव्हेंबर दरम्यान पुणे ते कन्याकुमारी या सायकल मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेमध्ये त्यांनी १५५० किमीचे अंतर त्यांनी या दहा दिवसात पूर्ण केले. एका दिवसात सुमारे दीडशे किमीचा टप्पा ते रोज पार करत होते. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू या राज्यातून त्यांनी प्रवास केला.

पहाटे ५ वाजता ते सायकल चालविण्यास सुरुवात करत असत. हा १५० किमीचा टप्पा गाठण्यासाठी रोज किमान १० ते ११ तास त्यांना सायकल चालवावी लागत असे.

या मोहिमेत जितीन इंगवले यांच्यासह सुनील अडसूळ, संजय टिळेकर, चंद्रकांत ववले, संतोष दरेकर, संदीप बोडके, विनोद बोडके, गणेश गोरे, आशुतोष देसले, सुमीत पवार, रामदास दरेकर, अनिकेत इंगवले यांच्यासह वाहन सहाय्यक संतोष इंगवले सहभागी झाले होते. जितीन इंगवले म्हणाले की, या मोहिमेसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून आम्ही सर्वजन दररोज किमान ३०-४० किमीचा तर आठवड्यातून एक दिवस १०० ते १२० किमी प्रवास करताना या मोहिमेचा सराव केला. यामुळेच ही अवघड मोहिम पूर्ण करण्यात आम्ही सर्वजन यशस्वी झालो आहोत.

> सायकलपटू जितीन इंगवले आणि त्यांच्या ११ सहकाऱ्यांनी पर्यावरणाच्या जनजागृतीसाठी एवढी मोठी मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली याबाबत त्यांचे मनापासून अभिनंदन. मनाचा निग्रह आणि सरावातील सातत्य या दोन गोष्टींच्या जोरावर एवढी मोठी मोहीम पूर्ण करण्यात या सर्वांना यश मिळाले आहे. या मोहिमेतून त्यांनी ‘पर्यावरण वाचविण्याचा’ संदेश देखील महत्वपूर्ण आहे.
>
> **- शंकर जगताप, शहराध्यक्ष, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# मी लेचापेचा नाही, डेंग्यूमुळे आजारी!

## » अजित पवारांकडून विरोधकांचा समाचार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा वाद सुरु असताना अचानक उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डेंग्यूची लागण झाल्याची बातमी येऊन धडकली. त्यानंतर अजित पवार यांची वारंवार बदललेली कृती पाहता त्यांना राजकीय डेंग्यू तर झाला नाही ना या चर्चांनी जोर धरला.**

अजित पवारांचं आजारपण खरं की खोटं याची संपूर्ण राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली. आज या चर्चांवर अजित पवारांनी पहिल्यांदाच आपल्या खास शैलीत उत्तर दिले आहे. 'मी लेचापेचा माणूस नाही. गेले 15 दिवस डेंग्यूमुळे आजारी होतो, राजकीय आजार माझ्या स्वभावात नाही. मी माझी मतं गेल 32 वर्षे स्पष्टपणे मांडत असतो', असे म्हणत अजित पवारांनी विरोधकांच्या टीकेचा समाचार घेतला. तर अमित शाहांना तक्रार करण्यासाठी भेटलो नसल्याचं स्पष्टीकरण या वेळी अजित पवारांनी दिले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यातील सारथी संस्थेच्या कार्यालयाला भेट देऊन संस्थेच्या आवारात सुरु असलेल्या बांधकामाची पाहणी केली. त्यावेळी अजित पवार बोलत होते. यावेळी अजित पवारांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना काम लवकर करण्याच्या सूचना दिल्या. बांधकामासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन अजित पवार यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. मराठा समाजाला वेगवेगळ्या योजनांचा लाभ व्हावा आणि मराठा समाजातील तरुणांना प्रशिक्षण मिळावे यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. अजित पवार म्हणाले, माजी उपपंतप्रधान पहिले मुख्यमंत्री चव्हाणांची आज पुण्यतिथी म्हणून त्यांना अभिवादन केलं. दिवाळीपूर्वी डेंग्यूमुळे 15 दिवस वाया गेले. राजकीय आजार माझ्या स्वभावात नाही. मी माझी मतं गेल 32 वर्षे स्पष्टपणे मांडत आलो आहे. मध्यंतरी अमित शहांना भेटलो. तक्रार करण्यासाठी अमित शाहांना भेटल्याची माहिती खोटी आहे. तक्रार करणे माझ्या स्वभावात नाही. भाड्याच्या जागेत शासकीय ऑफिस नको आहेत.राज्यात अनेक बदल झाले आहेत. शासकीय इमारती चांगल्या असाव्यात त्या सरकारी जागेत असाव्यात. पुढची 50 वर्ष डोळ्यासमोर ठेवून चांगले आर्किटेक घेऊन,अधिकाऱ्यांशी बोलून इमारती बांधत आहेत. वेगात काम सुरू आहेत,निधी कमी पडू देणार नाही, कामाच्या बाबतीत गती मंदावू नये असा आमचा मानस आहे. कृषी भवन, कामगार भवन, शिक्षण भवन, सारथीची इमारत या सरकारी जागेत असाव्यात असा निश्चय केला होता. त्याची बहुतेक काम सुरु झालेली आहेत. अंतरवली सराटीतील अटकेबाबत मला माहिती नाही. त्याबाबत माहिती घेतो. आरक्षणाबाबतीत काम सुरू आहे. कोणीही भडकाऊ भाषण करू नये, सुसंस्कृत महाराष्ट्र कसा आहे हे यशवंतराव चव्हाण यांनी दाखवले आहे. सत्ताधारी असो विरोधक असो कोणीही असो त्यांनी भडकाऊ भाषण करू नये. वाचाळवीरांनी समाजामध्ये तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्या राज्यात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. लवकरच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांची दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री याच्या उपस्थितीत पाण्याबाबत बैठक घेणार आहे.



### राज्यात अनेक बदल झाले आहेत

» भाड्याच्या जागेत शासकीय ऑफिस नको आहेत. राज्यात अनेक बदल झाले आहेत. शासकीय इमारती चांगल्या असाव्यात त्या सरकारी जागेत असाव्यात. पुढची 50 वर्ष डोळ्यासमोर ठेवून चांगले आर्किटेक घेऊन,अधिकाऱ्यांशी बोलून इमारती बांधत आहेत. वेगात काम सुरू आहेत,निधी कमी पडू देणार नाही, कामाच्या बाबतीत गती मंदावू नये असा आमचा मानस आहे. कृषी भवन, कामगार भवन, शिक्षण भवन, सारथीची इमारत या सरकारी जागेत असाव्यात असा निश्चय केला

---

# दूध दरवाढीसाठी इंदापुरात रस्त्यावर दूध ओतून शेतकऱ्यांचा रास्ता रोको!

## » दुधासाठी निश्चित केलेला हमी दर न देणाऱ्या सरकारी व खाजगी दूध प्रकल्पांवर कारवाईची मागणी

। इंदापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शासनाने दुधासाठी निश्चित केलेला हमी दर न देणाऱ्या सरकारी व खाजगी दूध प्रकल्पांवर कारवाई करावी, दुधाला प्रति लिटर ४० रुपये दर मिळावा. या व इतर मागण्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी आज इंदापुरातील शेतकऱ्यांनी पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दूध ओतून देत रास्ता रोको आंदोलन केले.**



या आंदोलनात तरूण व सुशिक्षित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कांदलगाव येथील ओंकार सरडे व सागर पेटकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. पोलीस निरीक्षक दिलीप पवार व मंडलाधिकारी सोपान हगारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सरडे व पेटकर यांनी सांगितले, की मागील कालावधीपासून दुधाचा दर सातत्याने घसरत चालला आहे. सध्या तो ३५ रुपयांवरुन अचानक कमी होवून २५ रुपयांवर आला आहे. त्यामुळे दूध उत्पादकांना मोठ्या अर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. यंदाच्या वर्षी अत्यल्प पाऊस झाला आहे. शेतपीक येईल की नाही याची खात्री नाही. या आंदोलनाची दखल न घेतल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन करण्याचा आमचा विचार आहे, असे ही त्यांनी स्पष्ट केले.

दुधाला प्रति लिटर ४० रुपये दर मिळावा.जनावरांसाठी चारा डेपो तयार करावेत. शासनाकडून पेंड मिळावी. प्रत्येक गावात पशुवैद्यकीय दवाखाना सुरू करावा. गेल्या पाच वर्षातील भेसळ प्रतिबंधक कारवायांचा अहवाल सादर करावा. जनावरांसाठी विनाशुल्क विमा सुरक्षा कवच योजना सुरू करावी. दूध दर मूल्य आयोगाची स्थापना करावी, शासकीय हमीभावाप्रमाणे दर न देणाऱ्या सरकारी व खाजगी प्रकल्पांवर कारवाई करावी. अशा आमच्या मागण्या असून त्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र केले जाईल, असेही ओंकार सरडे यांनी स्पष्ट केले.

# रेल्वेच्या ब्लॉकमुळे प्रवांशाचे सलग दुसऱ्या दिवशी हाल



। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

पुणे – लोणावळा रेल्वे मार्गावरील शिवाजीनगर ते खडकी स्थानकांदरम्यान इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग आणि स्वयंचलित सिग्नलिंग प्रणालीचे काम करण्यात आले. या कामासाठी दोन दिवस ब्लॉक घेण्यात आला. त्यामुळे रविवारी सलग दुसऱ्या दिवशी लोकल सेवेसह अनेक गाड्या रद्द झाल्याचा मोठा फटका प्रवाशांना बसला.

रेल्वेच्या ब्लॉकमुळे शनिवारी (ता.२५) मुंबईहून सुटणाऱ्या काही गाड्या रद्द होत्या. पुणे- तळेगाव -लोणावळा-पुणे दरम्यान धावणाऱ्या सर्व ४६ लोकल गाड्या रद्द होत्या. त्याचबरोबर अनेक गाड्या विलंबाने धावल्याने प्रवाशांचे हाल झाले होते. सलग दुसऱ्या दिवशी रविवारीही प्रवाशांना या ब्लॉकचा फटका बसला. आजही सर्व ४६ लोकल गाड्या रद्द राहिल्या. याचबरोबर पुण्याहून मुंबईला सुटणाऱ्या पुणे – मुंबई डेक्कन क्वीन एक्स्प्रेस, पुणे-मुंबई सिंहगड एक्स्प्रेस, पुणे – मुंबई – पुणे डेक्कन एक्स्प्रेस, पुणे – मुंबई- पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस, मुंबई – कोल्हापूर- मुंबई कोयना एक्स्प्रेस या गाड्या रद्द राहिल्या.

# अबब..! तब्बल सात कोटींचा अश्व!

## पशू प्रेमींची पाहण्यासाठी झुंबड : मोशी येथील देशी गोवंश व अश्व प्रदर्शनाला तुफान गर्दी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तब्बल सात कोटी रुपये किमतीचा अश्व... असे म्हटल्यास अविश्वसनीय वाटत असेल. पण, होय... पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित देशातील सर्वात मोठ्या देशी गोवंश व अश्व पशू प्रदर्शनामध्ये सात कोटी रुपयांचा जातीवंत अश्व पहायला मिळाला. तो दिसतो कसा...? हे पाहण्यासाठी अक्षरशः पशू प्रेमींची झुंबड उडाली आहे.**



अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र येथे दि.२५ आणि दि. २६ नोव्हेंबर असे दोन दिवस भारतातील सर्वात मोठे देशी गोवंश व अश्व प्रदर्शन तसेच पशू आरोग्य शिबीर आयोजित केले आहे. या पशुप्रदर्शनामध्ये खिल्लार, देवणी, लालकंधारी, थारपारकर, म्हैस, रेडा, कांकरेंज, गीर, डांगी, साहिवाल, पुंगनूर, मालनाड गिड्डा, कपिला गाय बैल तसेच मारवाडी व भीमथडी अश्व मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे.

### फ्रेंजेड जी...चे पशूप्रेमींचे लक्ष वेधले..!

मूळचा राजस्थानी असलेल्या या घोड्याचं नाव आहे फ्रेंजेड जी. हा मारवाडी प्रकारचा घोडा आहे. फ्रेजेंडचा खुराक जाणून तुम्हालाही धक्का बसेल. घोडा मालक युवराज जडेजाने सांगितले की, हा घोडा १५ लीटर दूध पितो. दररोज ५ किलो हरभरा आणि ५ किलो डाळी खातो. आणि हो फक्त 'मिनरल वॉटर'च पितो. फ्रेजेंड हाइब्रिड असल्याचे घोडा मालक सांगतात. फ्रेजेंडचे वडील राजस्थानी, तर आई रत्नागिरी प्रजातीची आहे. तो ४ वर्षांचा असून गेल्या दीड वर्षांपासून युवराजसोबत आहे. फ्रेजेंडने आतापर्यंत गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. तसेच तब्ब्ल ११०० हुन स्पर्धांमध्ये तो 'विजेता' ठरला आहे. आजपर्यंत एकाही घोड्याने त्याचा पराभव केलेला नाही.

### कोण आहेत युवराज जडेजा?

युवराज हे व्यवसायाने जमीनदार आणि आडतदार आहेत. ते गुजरातचे रहिवासी आहेत. फ्रेंजेडच्या देखभालीवर दरमहा अडीच ते तीन लाख रुपये खर्च होत असल्याचे त्यांनी सांगितले. घोड्याची काळजी घेण्यासाठी चारजण नेहमी सोबत राहतात. घोड्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी खास रुग्णवाहिकेसारखी गाडी असते. घोड्याच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी २४ तास एक डॉक्टरही तैनात असतो.

---

# संवैधानिक अधिकारांसोबत कर्तव्यांचेही पालन करा !

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे आवाहन; संविधान दिनी उद्देशिका पालनाची घेतली शपथ

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सामाजिक आणि आर्थिक न्याय, आचार,विचार, धर्म, श्रद्धा यांचे स्वातंत्र्य आणि राजकीय समानता व समान संधी देण्याचे अभिवचन देणारे भारतीय संविधान दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण भारतीयांनी अंगिकृत केले. आजच्या या मंगलदिनी संविधानातील अधिकार स्वातंत्र्यासोबतच कर्तव्ये आणि जबाबदारी पालनाचाही संकल्प प्रत्येक नागरिकाने केला पाहिजे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड भाजपाच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे भारतीय संविधान दिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधानातील "उद्देशिका" पालन करण्याची शपथ घेण्यात आली.

यावेळी मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे, महिला मोर्च्याच्या अध्यक्षा सुजाता पालांडे, सरचिटणीस वैशाली खाड्ये, भाजपा उपाध्यक्ष माऊली थोरात, शहर सरचिटणीस संजय मंगोडेकर, नामदेव ढाके, शहर कार्यकारिणी सदस्य निता कुशारे, माजी नगरसेवक बाबा त्रिभुवन, सागर अंगोळकर, संतोष कांबळे, माजी नगरसेविका सविता खुळे, मा. स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, मंडल अध्यक्ष संदीप नखाते, निलेश अष्टेकर, प्रसाद कस्पटे, सोमनाथ भोंडवे, आयुष्यमान भारत संयोजक गोपाळ माळेकर, ओबीसी मोर्च्याचे अध्यक्ष राजेंद्र राजापूरे, सहकार सेलचे अध्यक्ष माधव मनोरे, उत्तर भारतीय आघाडीचे अध्यक्ष आकाश भारती, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ जांभूळकर, कृष्णा भंडलकर, श्रीकांत पवार, प्रकाश जावळकर, दीपक भंडारी, हृषीकेश कांबळे, सागर बिरारी, उज्वला गावडे, सोना गडदे, नीता मुंगसे आदी उपस्थित होते.

> "जगातील सर्वेश्रेष्ठ राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली देशात भारतीय संविधानामुळे सामाजिक शांतता आणि समानता प्रस्तापित झाली. 'आम्ही भारताचे लोक...' असा विश्वास देणाऱ्या संविधान दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने भारतीय संविधानातील अधिकारांचे स्वातंत्र्य उपभोगावे आणि कर्तव्याचे पालनही केले पाहिजे. देशाला बलशाली बनवण्यासाठी संवैधानिक मूल्यांचे जतन करण्याची आवश्यकता आहे.
>
> -शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड

# सुधारणा म्हणजे नक्कल कशी असू शकते?



## भूमिका

**भारतीय दंड संहिता, १८६०, भारतीय पुरावा कायदा १८७२ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ या फौजदारी कायद्यांच्या त्रिमूर्ती आहेत. भारतीय दंड संहितेचे लेखक थॉमस बॅबिंग्टन मॅकॉले हे पहिल्या कायदा आयोगाचे अध्यक्ष होते. सर जेम्स फिटजेम्स स्टीफन हे पुरावा कायद्याचे लेखक होते. १९७३ चा कायदा संमत झाल्यावर १८९८ ची पहिली फौजदारी प्रक्रिया संहिता रद्द करण्यात आली.**



देशभरातील शेकडो न्यायालयांमध्ये हे तीन कायदे दररोज अमलात आणले जातात. हजारो न्यायाधीश आणि दीड लाखांहून जास्त वकील (ज्यांच्यापैकी बरेचसे फौजदारी वकील आहेत) दररोज या तीन कायद्यांचा आधार घेत आपले काम करतात. प्रत्येक न्यायाधीशांना किंवा वकिलांना माहीत असते, की भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ नुसार 'खुनाची शिक्षा' दिली जाते. त्यांना माहीत असते की पुरावा कायद्याच्या कलम २५ नुसार पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेली कबुली ही आरोपीविरुद्ध गुन्हा म्हणून सिद्ध करता येत नाही. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७, ४३८ आणि ४३९ मध्ये अटकपूर्व जामीन तसेच जामिनासाठीची तरतूद असते, हेदेखील त्यांना माहीत असते. या तीन कायद्यांच्या कित्येक तरतुदी न्यायमूर्ती आणि वकिलांना तोंडपाठ असतात. कायद्यातील सुधारणा ही चांगली कल्पना आहे; पण कायद्यातील सुधारणा याचा अर्थ विद्यमान तरतुदींची पुनर्रचना किंवा पुनक्रमण करणे असा होत नाही. सध्याच्या काळात आणि परिस्थितीत फौजदारी कायदा कसा असावा यावर एक व्यापक भाष्य असायला हवे. कायदा बदलती मूल्ये, नैतिकता, आचार आणि आकांक्षा यांच्याशी सुसंगत असला पाहिजे. गुन्हे व गुन्हेगारीविषयीचे आधुनिक शास्त्र, गुन्हेगारी न्यायशास्त्र आणि शिक्षाशास्त्रामधील फायदेशीर घडामोडी नवीन कायद्यात योग्यरीत्या प्रतिबिंबित केल्या पाहिजेत. पण, तीन विधेयकांमध्ये आपल्याला काय आढळते? अनेक कायदेपंडितांनी या तिन्ही विधेयकांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांना आढळून आले की भारतीय दंड विधान संहितेच्या ९० ते ९५ टक्के तरतुदी नवीन मसुद्यात तशाच्या तशा उचलल्या गेल्या आहेत. नवीन विधेयकात भारतीय दंड विधान संहितेच्या २६ प्रकरणांपैकी तब्बल १८ प्रकरणे (तीन प्रकरणांमध्ये प्रत्येकी एकच विभाग होता) जशीच्या तशी घेण्यात आली आहेत. स्थायी समितीच्या अहवालात मान्य करण्यात आले आहे की, विधेयकात, भारतीय दंड विधान संहितेच्या ५११ कलमांपैकी, २४ कलमे हटवण्यात आली होती आणि २२ कलमे जोडण्यात आली होती. उर्वरित विभाग राखून ठेवलेले होते, परंतु त्यांची पुनर्रचना करण्यात आली. भारतीय दंड विधान संहितेमधील सुधारणांद्वारे काही बदल सहज करता आले असते. पुरावा कायदा आणि फौजदारी प्रक्रिया संहितेबाबत तीच गोष्ट आहे. पुरावा कायद्याच्या १७० कलमांपैकी प्रत्येक कलम तिथून उचलून इथे चिकटवण्यात आले आहे. या पद्धतीने तब्बल ९५ टक्के फौजदारी प्रक्रिया संहिता तशीच्या तशी उचलण्यात आली आहे. त्यामुळे हा संपूर्ण प्रयत्न व्यर्थ ठरला आहे. यापुढच्या काळात विधेयके मंजूर झाली तर अनेक अनिष्ट परिणाम होतील. एवढेच नाही तर शेकडो न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी, कायद्याचे शिक्षक आणि कायद्याचे विद्यार्थी एवढेच नाही तर सर्वसामान्य लोकांचीही प्रचंड गैरसोय होणार आहे. त्यांना कायदे 'पुन्हा शिकावे' लागतील. विधेयकांच्या मसुद्यात ज्या स्वागतार्ह तरतुदी आहेत, त्यांच्याबद्दल सरकार संसदेत सांगेलच. मी त्यामधील त्रुटी, शंकास्पद गोष्टी दाखवू इच्छितो. त्यातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत. फाशीची शिक्षा रद्द करण्यासाठी सार्वत्रिक चर्चा असूनही ती कायम ठेवण्यात आली आहे. गेल्या सहा वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने केवळ सात प्रकरणांमध्ये फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले आहे. उरलेल्या आयुष्यासाठी पॅरोलविना तुरुंगवास ही खरे तर दोषी व्यक्तीला सुधारण्याची संधी उपलब्ध करून देतानाच दिलेली अधिक कठोर शिक्षा आहे. व्यभिचार हा गुन्हा म्हणून परत आला आहे. व्यभिचार हा पती-पत्नीमधील विषय आहे. त्यांच्यातील नाते तुटले असेल तर, पीडित जोडीदार घटस्फोट किंवा नुकसानीसाठी दावा दाखल करू शकतो. त्यांच्या जीवनात ढवळाढवळ करायला राज्ययंत्रणेकडे दुसरे काम नाही की काय? सर्वात वाईट म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलेले भारतीय दंड विधान संहितेचे कलम ४९७ पुन्हा तटस्थ स्वरूपात आणले गेले आहे.

## संपादकीय »

### बँकांना दिलासा!

***मद्रास उच्च न्यायालयाने अलीकडेच नागरी सहकारी बँकांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक म्हणावा असा निकाल दिला आहे.***

त्यामुळे एका सहकारी बँकेने दुसऱ्या सहकारी बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजावर आता कर सवलतीचा लाभ मिळणार आहे. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये किंवा राज्य सहकारी बँकांमध्ये गुंतवणूक केल्यासही त्यापोटी मिळणाऱ्या व्याजावर कर सवलत मिळणार आहे. ही बाब अर्थातच सहकारी बँकांसाठी फायदेशीर ठरणार आहे. सहकार क्षेत्राला अन्यही अनेक जाचक नियमांबाबतची लढाई यापुढील काळात लढावी लागणार आहे. विशेषतः बँक नियमन कायद्यातील बदलांबाबत सहकारी बँकांनी आक्षेप घेतलेले आहेत. त्या लढाईला ताज्या निर्णयामुळे काहीसे बळ मिळणार आहे. नागरी सहकारी बँकांची नोंदणी मूळतः सहकारी संस्था म्हणून होत असते. यामुळे सुरुवातीपासूनच आयकर कायद्यातील कलम 80 (पी) (2) नुसार या बँकांना उत्पन्नावरील करातून सवलत मिळत होती.

**भारतातील कापसाच्या आजवरच्या प्रवासाचा माग काढत गेल्यास आपण सिंधू संस्कृतीच्या उदयापूर्वी अनेक शतके एवढ्या दूर जाऊन पोहोचतो. आज कापसाची अनेक वाणे, त्यांच्या दरांवरून दरवर्षी उमटणारे पडसाद, त्यावर उभारलेले अर्थकारण याचा विचार करताना कापसाचे हे विविध प्रकार भारतात नेमके कधी आले, कोणत्या देशांतून आले, कोणत्या राज्यांत त्यांची सर्वप्रथम लागवड झाली, हे जाणून घेणे रंजक ठरते.**

# पांढऱ्या सोन्याचा अखंड धागा..!

२ ते ५ डिसेंबरदरम्यान मुंबईत होत असलेल्या 'आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती'च्या अधिवेशनानिमित्त, पांढऱ्या सोन्याच्या इतिहासाच्या या अखंड धाग्याविषयी.. येत्या २ ते ५ डिसेंबर २०२३ दरम्यान मुंबईतील 'जिओ वल्र्ड कन्व्हेन्शन सेंटर'मध्ये आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती (आयसीएसी)चे अधिवेशन होत आहे. 'कॉटन व्हॅल्यू चेन: लोकल इनोव्हेशन्स फॉर ग्लोबल प्रॉस्परिटी' अर्थात 'कापूस मूल्य साखळी: जागतिक भरभराटीसाठी स्थानिक नवोन्मेष' ही या अधिवेशनाची संकल्पना आहे. अधिवेशनात चर्चात्मक देवाणघेवाणीच्या माध्यमातून, उत्पादकांचे ज्ञानवर्धन करण्यासाठी आणि हे ज्ञान प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी विविध चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. 'कापसाने एकमेकांना जोडणारे अद्भुत खंड' हे या वर्षीच्या अधिवेशनाचे शीर्षक आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतातील



कापूस उत्पादन आणि वस्त्रनिर्मिती याची माहिती घेणे रंजक ठरेल. भारताला कापूस उत्पादन आणि धाग्यांपासून वस्त्रनिर्मितीचा गौरवशाली इतिहास लाभला आहे. सिंधू संस्कृतीच्या उदयापूर्वी अनेक शतकांपासून, काची मैदान, बलुचिस्तान येथून हा इतिहास सुरू होतो. इसवीसनपूर्व सुमारे तीन हजार वर्षे सिंधू नदीच्या आसपास, कापसाचे मोठ्या प्रमाणावर पीक घेतले जात असे. १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत, भारतीय उपखंडात फक्त गॉसिपियम आबरेरियम आणि गॉसिपियम हर्बेशियम या देशी कापसाची लागवड होत होती. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती आणि अमेरिकी क्रांतीयुद्धा (१७७५-१७८३) नंतर भक्कम आणि लांब धाग्यांच्या निर्यातीच्या मागणीमुळे भारतीय उपखंडात अमेरिकी (जी. हिर्सुटम) कापसाच्या लागवडीसाठी वैज्ञानिक प्रयत्नांना बळ मिळाले. १७९० मध्ये, माल्टा आणि बर्बन या शहरांमधील जी. हिरसूटम रेस पंक्टेटम, हा अमेरिकी कापूस, द्वीपकल्पीय भारतातील मद्रास आणि बॉम्बे प्रांतांमध्ये लागवडीखाली आला. १८२९ मध्ये धारवाड, भरूच आणि खान्देश येथे कापसाचे बगिचे तयार केले गेले. इथे, ब्राझिलियन, इजिप्शियन, अमेरिकी बर्बन, सी आयलँड आणि न्यू ऑर्लीन्स अशा परदेशी कापूस वाणांची लागवड करून चाचण्या घेण्यात आल्या. १८४२ मध्ये, धारवाड भागातील स्थानिक 'कुमटा' कापसाच्या जागी न्यू ऑर्लिन्स या कापसाची मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक लागवड करण्यात आली. १८३९ मध्ये, मध्य प्रांत आणि बेरार प्रांतात (हैदराबादशी संलग्न प्रांत ज्यात विद्यमान महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाड्याचा भाग समाविष्ट होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# केस पांढरे होऊन उपयोग काय?

## भुजबळांच्या भाषणावर जरांगे पाटलांच चोख प्रत्युत्तर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वय झाल्यामुळे भुजबळ असं बोलतात, त्यांचे केस पांढरे होऊन उपयोग काय, जर दुसऱ्या समाजाबद्दल आकस असेल.' असं म्हणत जरांगे पाटलांनी (MANOJ JARANGE) हिंगोलीतील भुजबळांच्या (CHHAGAN BHUJBAL) भाषणावर प्रत्युत्तर दिलं आहे. हिंगोलीतील ओबीसी एल्गार सभेतून (OBC SABHA) छगन भुजबळ यांनी जरांगे पाटलांची चांगलाच समाचार घेतला.**

मला म्हातारा म्हणतोय,पण डोक्याचे जेवढे केस पिकलेत तेवढी आंदोलनं केलीत, असं भुजबळांनी म्हटलं बोलताना म्हटलं होतं. तुमच्या पांढऱ्या केसांचा आता काही उपयोग नाही, असं म्हणत जरांगे पाटलांनी छगन भुजबळांवर हल्लाबोल केला. सध्या राज्यात सुरु असलेल्या ओबीसी विरुद्ध मराठा हा वाद चांगलाच पेटल्याचं पाहायला मिळतंय. तसेच भुजबळ आणि जरांगे पाटलांकडून एकमेकांवर वयक्तिक पातळीवर देखील टीका होत असल्याचं चित्र आहे. भुजबळांना काहीच माहित नाही, मग कशाला केस पांढरे केलेत, असा सवाल मनोज जरांगे यांनी केलाय.

भुजबळांच्या आंदोलनाच्या मुद्द्यावर देखील जरांगे पाटलांनी उत्तर दिलंय. भुजबळांची आंदोलनं ही अशीच असतात वाटतं, ते बीडमध्ये अश्रू पुसायला गेले मग अंतरवाली सराटीमध्ये का आले नाहीत. भुजबळांचे केस पांढरे झालेत, पण त्याचा काहीच उपयोग नाही, असं जरांगे पाटील म्हणाले. बेदरे प्रकरणावर देखील मनोज जरांगे यांनी भुजबळांच्या



मुद्द्याला प्रत्युत्तर दिलंय. तो हल्ला आता झाला होता का? त्या गोळ्या पोलिसांनी झाडल्या होत्या. बायकांना सुद्धा गोळ्या लागल्या. उलट माझा प्रश्न आहे की, जालन्यातील लोकांना अटक का केली असा सवाल जरांगे पाटलांनी उपस्थित केलाय. हिंगोलीमध्ये ओबीसी एल्गार सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या सभेला अनेक ओबीसी नेत्यांनी हजेरी लावली होती. या सभेला दंगल सभा असं नाव द्यायला हवं, असं म्हणत जरांगे पाटलांनी ओबीसी सभेवर टीकास्त्र सोडलं. माझे पाय तोडायला येत असतील तर या मी वाट बघतोय. माझे पाय तोडायला तरी याल, मी माझ्या समाजासाठी काहीही करायला तयार आहे. पण मी ओबीसीतूनच मराठा आरक्षण घेणार, असा निश्चय जरांगे पाटलांनी यावेळी बोलून दाखवला. महाराष्ट्रात आरक्षणाचा विषय तापला आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचं आंदोलन चालू असताना ओबीसी नेत्यांनी मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देण्यास विरोध केला आहे. ज्या मराठा कुटुंबांकडे मागील दोन-तीन पिढ्यांमधील कुणबी नोंदी आहेत, अशा कुटुंबांना कुणबी जातप्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसीत समावेश केला जाणार आहे. परंतु, राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सुरुवातीपासून त्यास विरोध केला आहे. दरम्यान, हिंगोली येथे आज (२६ नोव्हेंबर) ओबीसी एल्गार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत बोलताना छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाविरोधात आक्रमक भूमिका मांडली. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने गठीत केलेली न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समिती तत्काळ रद्द करा आणि मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यावर ताबडतोब स्थगिती द्या, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

### तुमचंही आरक्षण रद्द होईल

» मनोज जरांगे पाटील म्हणाले, त्यांनी (भुजबळ) मागणी केल्याने काही होत नाही. त्यांना वाटतं की त्यांची दहशत आहे. त्या दहशतीखाली त्यांनी ७० वर्ष मराठ्यांना आरक्षण मिळू दिलं नाही आताही मिळू देणार नाही, असं त्यांना वाटतंय. त्यामुळे ते शिंदे समिती रद्द करा असं म्हणतायत. ते काय कायद्याचे आणि संविधानाचे मालक झालेत का? न्यायालयाच्याही पुढचा न्याय करायला निघालेत. स्वतःला काय समजतायत? कदाचित त्यांच्या वयोमानामुळे असं होत असेल. परंतु, त्यांच्या बोलण्याने कायदा चालत नाही. मनोज जरांगे पाटील म्हणाले, मराठ्यांना आरक्षण मिळणार आहे. आमचं आरक्षण रद्द झालं तर आपोआप तुमचंही रद्द होईल. त्यामुळे तुम्हाला ओबीसीत कसं घेतलं असा प्रश्न निर्माण होईल. आरक्षणासाठी शासकीय नोंदी किंवा मागास असल्याचा पुरवा लागतो. तुमच्याकडे दोन्ही नाही.

# मनोज जरांगे यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही

## हातपाय कापून ठेवण्याची ताकद ठेवा : बबनराव तायवाडे

। हिंगोली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**यापुढे ओबीसींच्या विरोधात जर कोणी बोलण्याची ताकद केली, त्याचे हातपाय त्याच ठिकाणी कापून ठेवण्याची ताकद तुमच्यात ठेवा, असे वक्तव्य ओबीसी नेते बबनराव तायवाडे (BABANRAO TAYWADE) यांनी केले आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र (KUNBI CERTIFICATE) देऊन त्यांचा ओबीसीत समावेश करण्यास ओबीसी नेत्यांनी विरोध केला आहे.**

यासाठी आज हिंगोलीत (Hingoli) ओबीसी मेळावा झाला. दरम्यान, यावेळी बोलतांना बबनराव तायवाडे यांनी मनोज जरांगे यांच्यावर



जोरदार हल्लाबोल केला. तसेच, ओबीसींच्या विरोधात बोलल्यास जरांगे यांना महाराष्ट्रात फिरू देणार नसल्याचे तायवाडे म्हणाले. यावेळी बोलतांना तायवाडे म्हणाले की. "मागील तीन महिन्यापासून राज्यात दोन समाजात संघर्ष सुरू आहे. ओबीसींच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी आम्ही संघर्ष करतोय. मंडळ आयोगाच्या अहवालात मराठा समाजाला फॉरवर्ड कास्ट म्हटलंय. एकाही आयोगाच्या अहवालात मराठा मागास असल्याचे सांगितले नाही. ओबीसींनी आमचं 70 वर्षापासून चोरलं असल्याचं म्हटलं जातं. पण कुठे चोरलं. आतापर्यंत सात अहवाल झाले पण एकाही अहवालात मराठा समाज ओबीसी असल्याचे सांगितले गेले नाही. हे आमची लायकी काढत आहे, आमची लायकी काढणारे हे कोण आहे. आमची लायकी नाही तर, मग आमच्या पंक्तीत कशाला येतायत असे तायवाडे म्हणाले. दरम्यान पुढे बोलतांना तायवाडे म्हणाले की, "यापुढे जर असा आमचा अपमान केल्यास महाराष्ट्रात फिरू देणार नाही. ओबीसींच्या विरोधात जर कोणी बोलण्याची ताकद केली, त्याचे हातपाय त्याच ठिकाणी कापून ठेवण्याची ताकद तुमच्यात ठेवा. तसेच, मनोज जरांगे यांचं जाहीर धिक्कार करतो. 32 लाख नोंदी सापडल्या असं जरांगे म्हणाले. किती मुर्ख आम्हाला बनवत आहे. एकाच व्यक्तीची अनेक ठिकाणी नोंदी आहेत, असे बबनराव तायवाडे म्हणाले. तायवाडे यांच्या याच टीकेला मनोज जरांगे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. "पाय तोडायला या, मी वाट बघतोय. माझ्या जनतेचे कल्याण होत असेल तर मी पाय तोडून घायला तयार आहे. मराठा समाजाला जर आरक्षण मिळत असेल, तर त्यासाठी पाय तोडून घ्यायला तयार असल्याचे जरांगे म्हणाले. हिंगोली येथील सभेत विजय वडेट्टीवार येणार की नाही याबाबत सकाळपासून चर्चा होती. मात्र, पक्षाच्या कामानिमित्त हैदराबादला गेलेल्या वडेट्टीवार या सभेत हजर नसल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, वडेट्टीवार गैरहजर राहिल्याने अनेक चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे यावर देखील जरांगे यांनी वक्तव्य केले आहे. आज तिथे सभेला वडेट्टीवार आले नाही, पंकजा मुंडे या देखील आज नव्हत्या.

### राज्यात दोन समाजात संघर्ष सुरू

» "मागील तीन महिन्यापासून राज्यात दोन समाजात संघर्ष सुरू आहे. ओबीसींच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी आम्ही संघर्ष करतोय. मंडळ आयोगाच्या अहवालात मराठा समाजाला फॉरवर्ड कास्ट म्हटलंय. एकाही आयोगाच्या अहवालात मराठा मागास असल्याचे सांगितले नाही. ओबीसींनी आमचं 70 वर्षापासून चोरलं असल्याचं म्हटलं जातं. पण कुठे चोरलं. आमची लायकी नाही तर, मग आमच्या पंक्तीत कशाला येतायत असे तायवाडे म्हणाले. दरम्यान पुढे बोलतांना तायवाडे म्हणाले की, "यापुढे जर असा आमचा अपमान केल्यास महाराष्ट्रात फिरू देणार नाही. ओबीसींच्या विरोधात जर कोणी बोलण्याची ताकद केली.

# चंद्रशेखर राव सत्ता राखणार?

## » काँग्रेस सत्तेचा सोपान गाठणार असल्याची चर्चा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पाचपैकी चार राज्यांमध्ये मतदान पूर्ण झाल्याने साऱ्यांच्या नजरा आता तेलंगणामधील अखेरच्या टप्प्यात होणाऱ्या मतदानावर आहेत. मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचा भारत राष्ट्र समिती पक्ष सत्ता कायम राखणार की काँग्रेस सत्तेचा सोपान गाठणार याचीच राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. तेलंगणात येत्या गुरुवारी (३० तारीख) मतदान होत आहे. निवडणूक आधी एकतर्फी होईल आणि चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखाली भारत राष्ट्र समिती सत्तेची हॅटट्रिक पूर्ण करेल, असेच एकूण चित्र होते.**




पण काँग्रेसने कर्नाटकच्या विजयानंतर तेलंगणात जोरदार मुसंडी मारली. काँग्रेसने अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांच्या फेस आणला आहे. काँग्रेसला आधी फारसे महत्त्व न देणाऱ्या चंद्रशेखर राव यांना अखेरच्या टप्प्यात काँग्रेसवर सातत्याने टीका करावी लागत आहे. इंदिरा गांधी यांच्यापासून काँग्रेसवर टीका करीत आहेत. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने केलेल्या पराभवावर चंद्रशेखर राव टिप्पणी करीत आहेत. तेलंगणात मधल्या काळात भाजपने जोर लावला होता. चंद्रशेखर राव यांना भाजपचेच आव्हान असेल, अशी वातावरणनिर्मिती दोन पोटनिवडणुकांमधील भाजपच्या विजयाने झाली होती. हैदराबाद महापालिका निवडणुकीत भाजपला हिंदू मतांच्या ध्रुवीकरणाचा फायदा झाला होता. पण गेल्या मे महिन्यात कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयाने तेलंगणातील चित्र बदलले. गलीतगात्र आणि गटबाजीने पोखरलेल्या काँग्रेसच्या आशा एकदमच पल्लवीत झाल्या. भाजपकडे जाणारा ओघ थांबला आणि अन्य पक्षातील नेते काँग्रेसमध्ये प्रवेश करू लागले. अखेरच्या टप्प्यात भारत राष्ट्र समिती आणि काँग्रेस अशी चुरशीची लढत होत आहे. मतदानपूर्व चाचण्यांमध्ये काँग्रेस सत्तेत येण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. काँग्रेसने भारत राष्ट्र समितीवरच आरोप सुरु केले. या सरकारच्या योजनांमधील त्रुटींवर लक्ष वेधले. मतदारांना कर्नाटकप्रमाणे पाच आश्वासने देत त्याची तात्काळ पूर्तता करण्याची ग्वाही दिली. ग्रामीण भागात चित्र बदलत आहे. भारत राष्ट्र समिती आणि काँग्रेसमधील लढतीत भाजप मागे पडला आहे. दक्षिणेकडील अन्य एका राज्यात काँग्रेस सत्तेत येणे भाजपला नकोच आहे. भारत राष्ट्र समिती पुन्हा सत्तेत आल्यास ते भाजपला फायदेशीरच ठरेल. शेवटच्या तीन-चार दिवसांत मतदारांवर अधिक प्रभाव पाडण्याचा सर्वच राजकीय

### ग्रामीण भागात चित्र बदलत आहे

» तेलंगणात मधल्या काळात भाजपने जोर लावला होता. चंद्रशेखर राव यांना भाजपचेच आव्हान असेल, अशी वातावरणनिर्मिती दोन पोटनिवडणुकांमधील भाजपच्या विजयाने झाली होती. हैदराबाद महापालिका निवडणुकीत भाजपला हिंदू मतांच्या ध्रुवीकरणाचा फायदा झाला होता. पण गेल्या मे महिन्यात कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयाने तेलंगणातील चित्र बदलले. गलीतगात्र आणि गटबाजीने पोखरलेल्या काँग्रेसच्या आशा एकदमच पल्लवीत झाल्या. भाजपकडे जाणारा ओघ थांबला आणि अन्य पक्षातील नेते काँग्रेसमध्ये प्रवेश करू लागले. अखेरच्या टप्प्यात भारत राष्ट्र समिती आणि काँग्रेस अशी चुरशीची लढत होत आहे. मतदानपूर्व चाचण्यांमध्ये काँग्रेस सत्तेत येण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. काँग्रेसने भारत राष्ट्र समितीवरच आरोप सुरु केले. या सरकारच्या योजनांमधील त्रुटींवर लक्ष वेधले. मतदारांना कर्नाटकप्रमाणे पाच आश्वासने देत त्याची तात्काळ पूर्तता करण्याची ग्वाही दिली. ग्रामीण भागात चित्र बदलत आहे.

# पंतप्रधान मोदींची तेजसमधून उड्डाण

## » काम काँग्रेसच्या काळातच पूर्णः जयराम रमेश

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी (NARENDRA MODI) यांनी तेजस (TEJAS FIGHTER JET) या स्वदेशी हलक्या लढाऊ विमानातून अवकाशात उड्डाण केलं आहे. त्यानंतर त्याचे फोटोही शेअर करत देशवासियांचे आभार मानले. पण मोदींनी श्रेय घेण्याचा प्रयत्न केलेल्या तेजसच्या डिझाईनला काँग्रेसच्या काळातच मान्यता देण्यात आल्याचं सांगत काँग्रेस नेते जयराम रमेश (JAIRAM RAMESH) यांनी टीका केली.**



तेजसचे डिझाइन करणारी संस्था एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीने (ADA) ही 1984 साली स्थापन करण्यात आली होती, त्यामुळे या आधीच्या सरकारने केलेल्या कार्याची दखल मोदींनी घ्यायला काही हरकत नव्हती अशी खोचक टीका जयराम रमेश यांनी केली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार जयराम रमेश यांनी ट्विटरवर म्हटलंय की, तेजस हे आमच्या स्वदेशी वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षमतेचं यश आहे. 1984 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीने (ADA) तेजसची रचना केली होती. या हलक्या लढाऊ विमानाचे डिझाईन 6 वर्षानंतर अंतिम करण्यात आले. जयराम रमेश यांनी सांगितलं की, तेजसची रचना ADA ने केल्यानंतर, त्यावर हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL), नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीज (NAL), भारतीय वायुसेना आणि भारतीय नौदलाच्या सहकार्याने काम करण्यात आले. जयराम रमेश म्हणाले की, तेजस या स्वदेशी हलक्या लढाऊ विमानाच्या डिझाइनला सहा वर्षांनंतर अंतिम रूप देण्यात आले. अखेर 2011 मध्ये त्याला कार्यान्वित मान्यता देण्यात आली. अर्थात असे आणखी अनेक महत्त्वाचे टप्पे आहेत. अनेक दशकांपूर्वी ही योजना मोठ्या निर्धाराने तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. जयराम रमेश यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, 'इलेक्शन फोटो-ऑप्स'च्या मास्टरला 2014 पूर्वीच्या प्रयत्नांना दाद देण्यास काही हरकत नाही. मोदी जे आता श्रेय घेतात ते काँग्रेसच्या काळातच पूर्ण झालं आहे. दरम्यान, शनिवारी (25 नोव्हेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगळुरू येथील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) केंद्रावरून तेजस या हलक्या लढाऊ विमानातून अवकाशात उड्डाण केले. त्यानंतर त्याची छायाचित्रेही सोशल मीडियावर शेअर करण्यात आली.

# चीनमध्ये गूढ न्यूमोनियाचा उद्रेक!


। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

चीनमधील बालकांमध्ये ‘एच९एन२’ (एव्हियन इन्फ्लूएंझा व्हायरस) आणि श्वसनविकार यांचा उद्रेक झाला असून करोनासारखाच या आजारांचा प्रसार होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गूढ न्यूमोनिया असलेला हा आजार चीनच्या उत्तर भागामध्ये पसरलेला असून अनेक बालकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हा आजार नेमका काय आहे, जागतिक आरोग्य संघटनेचे यावर काय मत आहे आणि खरोखर जागतिक चिंता करण्यासारखे आहे काय याचा आढावा. चीनच्या उत्तर भागात बालकांमध्ये श्वसनाचे विकार वाढल्यानंतर याबाबत माहिती देण्यासाठी चीनच्या राष्ट्रीय आरोग्य आयोगाने नुकतीच पत्रकार परिषद घेतली. उत्तर चीनमधील शैक्षणिक संस्थांमधून गूढ न्यूमोनियाचा उद्रेक झाल्याचे त्यांनी सांगितले. करोनासारखाच हा श्वसनविकार असून अनेक बालकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चीनमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या श्वसनविकारवाढीचा संबंध इन्फ्लूएंझा, मायकोप्लाझ्मा न्यूमोनिया, बॅक्टेरियाचा संसर्ग यांच्याशी जोडला असून हा आजार विशेषतः लहान मुलांना होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार बालकांमध्ये श्वसन आणि न्यूमोनियाशी संबंधित आजार आढळून आले आहेत, मात्र त्याची लक्षणे न्यूमोनियापेक्षा वेगळी आहेत. मुलांमध्ये तीव्र ताप, खोकला, श्वास घेण्यास त्रास आदी लक्षणे दिसून येतात.

# अमिताभ, अक्षयच्या चित्रपटाचा रिमेक आहे 'ॲनिमल'?




कबीर सिंग, अर्जून रेड्डी सारख्या चित्रपटांचे दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांच्या ॲनिमल नावाच्या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा आहे. त्यावरुन वेगवेगळ्या प्रतिक्रियांना उधाणही आले आहे. सोशल मीडियावर ॲनिमलवर नेटकऱ्यांनी टीकाही केली आहे. त्याचे कारण हा चित्रपट बॉलीवूडमधील एका चित्रपटाची कॉपी आहे असे नेटकऱ्यांचे म्हणणे आहे. बाप लेकाच्या नात्यावर भाष्य करणारा चित्रपट म्हणून ॲनिमलकडे पाहिले जात आहे. बॉलीवूडमध्ये या विषयावर आधारित अनेक चित्रपट झाले आहेत. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसादही मिळाल्याचे दिसून आले आहे. त्यात ॲनिमल आणि काही चित्रपटांची तुलना होत आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटातील तो फायटिंग सीन हॉलीवूडच्या ओल्ड बॉय मधील असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. ज्यांनी अमिताभ बच्चन आणि अक्षय कुमारचा जानवर नावाचा चित्रपट पाहिला असेल त्यांना ॲनिमलची स्टोरीलाईन समजून जाईल. अशा प्रकारच्या पोस्ट व्हायरल होत आहेत. या सगळ्यात एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. ज्यात ॲनिमलमधील अनिल कपूर आणि रणबीर कपूर यांच्यातील तो सीन आणि दुसरीकडे वक्तमधील अमिताभ अक्षय कुमारमधील तो सीन याची तुलना करण्यात आली आहे. ॲनिमलमध्ये रश्मिका रणबीरला म्हणते की, वडिलांप्रती त्याचं प्रेम हे प्रेम नसून तो एक आजार आहे. त्याच प्रमाणे अक्षय कुमारच्या त्या चित्रपटात करिश्मा कपूर त्याला म्हणते की, तू वडिल किंवा मी यांच्यापैकी एकाची निवड कर, तुला ती करावीच लागेल. हे दोन्ही व्हिडिओ पाहिल्यानंतर आता नेटकरी, चाहते गोंधळून गेले आहेत आणि चर्चा करु लागले आहेत की रणबीरचा हा चित्रपट कॉपी पेस्ट चित्रपट तर नाही ना...

# 'पिंगा गं पोरी' वर ओरी जान्हवीचा डान्स

सध्या सोशल मीडियावर ओरहान अवत्रामणी (ORHAN AWATRAMANI) उर्फ ओरीची (ORRY) चर्चा होत आहे. ओरी हा बिग बॉसच्या घरात देखील गेला आहे. ओरी हा सोशल मीडियावर विविध अभिनेत्रींसोबतचे फोटो शेअर करतो. अशातच आता ओरीनं एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. बाजीराव मस्तानी या चित्रपटातील "पिंगा गं पोरी" या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ ओरीनं शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये तो जान्हवी कपूरसोबत डान्स करताना दिसत आहे. या व्हिडीओमध्ये जान्हवी ही व्हाईट ड्रेस, पिवळी ओढणी आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसत आहे तर ओरी हा ब्लू पँट आणि रेड टीशर्ट अशा लूकमध्ये दिसत आहे. अनेक नेटकऱ्यांनी जान्हवी आणि ओरीच्या डान्सच्या व्हिडीओला कमेंट्स केल्या आहेत. "ब्रो हृतिक रोशनसारखा डान्स करतो", अशी कमेंट एका नेटकऱ्यानं केली आहे. शिखर पहाडियानं देखील जान्हवी आणि ओरीच्या या डान्स व्हिडीओला कमेंट केली आहे. 'खिलौना बना खलनायक.' अशी कमेंट शिखरनं जान्हवी आणि ओरीच्या डान्सच्या व्हिडीओला केली आहे. शिखर हा जान्हवीला डेट करत आहे, असं म्हटलं जात आहे. ओरी हा विविध बॉलिवूड पार्ट्यांमधील फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. या फोटोमध्ये ओरी आणि बॉलिवूडमधील कलाकार दिसतात. सध्या ओरी हा बिग बॉलमुळे चर्चेत आहे.ओरीची गेल्या काही दिवसांपासून सोशल चर्चा होत आहे. ओरी नेमकं काय काम करतो? त्याची लाईफस्टाईल कशी आहे? या सर्व गोष्टींबाबत जाणून घेण्यास नेटकरी उत्सुक होते. काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीमध्ये ओरीनं त्याच्या कामाबद्दल सांगितलं आहे. तो म्हणाला,"तुम्ही नोकरीसाठी जात असाल तर, तुम्ही नोकरदार आहात. तुम्ही चित्र काढत असाल तर, तुम्ही चित्रकार आहात. तसेच मी जगत आहे, त्यामुळे मी एक लिव्हर आहे." जान्हवी कपूरचा 'बावल' हा चित्रपट काही महिन्यांपूर्वी रिलीज झाला. आता जान्हवी ही 'मिस्टर अँड मिसेस माही' या चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# अनन्या पांडेवर गुन्हा दाखल करा!

शाहरुख आणि प्रसिद्ध अभिनेता चंकी पांडेची लेक अनन्या पांडे हे अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यांच्या विरोधात कॉंग्रेसच्या एका प्रवक्त्यानं मुंबई पोलिसांना निवेदन दिले असून त्यात शाहरुख आणि अनन्यावर गुन्हा दाखल करावा असे म्हटले आहे. कॉंग्रेसच्या त्या प्रवक्तत्याचे नाव राकेश शेट्टी असे असून त्यांनी शाहरुख आणि अनन्याच्या विरोधात मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल करावा अशी मागणी त्या निवेदनाद्वारे केली आहे. त्याचे मुख्य कारण अंबानी परिवाराची बर्थ डे पार्टी असल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या सोशल मीडियावर तो व्हिडिओ व्हायरल झाला असून त्यावरुन वेगळ्याच वादाला सुरुवात झाली आहे. अनन्यानं वन्यजीव सुरक्षितता या नियमाचे उल्लंघन केल्याचे शेट्टी यांचे म्हणणे आहे. व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओमध्ये अनंत अंबानी हे एक साप शाहरुखच्या हातात देत असताना दिसत आहे. शाहरुखनं तो साप हातात घेत फोटोसाठी पोझ दिल्याचे सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. दुसऱ्या फोटोमध्ये अनन्या पांडेनं देखील एक सर्प हातात घेत फोटो शेअर केला आहे.

# म्हणून ती माझे केस विंचरते

अभिनेत्री प्राजक्ता माळी ही महाराष्ट्राची हास्यजत्रेमुळे सध्या घराघरात पोहोचली आहे. याआधी प्राजक्ताने जुळुन येती रेशीमगाठी, नकटीच्या लग्नाला अशा मालिकांमधून प्रेक्षकांचं प्रेम मिळवलंय. प्राजक्ता सोशल मीडियावर तिच्या आयुष्यातले विविध अपडेट्स शेअर करत असते. नुकताच प्राजक्ताने एक व्हिडीओ शेअर केलाय. या व्हिडीओत प्राजक्ताने तिच्या ाचीसोबतचा एक व्हिडीओ शेअर केलाय. काय आहे हा व्हिडीओ. प्राजक्ता माळीने एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केलाय.




# घर खरेदी करण्याच्या बातम्यांवर अदानं सोडलं मौन

अभिनेत्री अदा शर्मा ही द केरळ स्टोरी चित्रपटानंतर चांगलीच प्रसिद्धी झोतात आली आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. अदा सोशल मिडियावरही खुप सक्रिय असते. त्यातच काही दिवसांपुर्वी अदा शर्मा ही दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या घराजवळ स्पॉट झाली होती. त्यानंतर अदा सुशांतचं घर विकत घेणार अशा चर्चा सुरु झाल्या होत्या. आता अदाने गेल्या काही दिवसांपासून सुरू




असलेल्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे. अदा खरचं सुशांत सिंगचे घर विकत घेणार आहे का याबाबत ती नुकतीच एका मुलाखतीत स्पष्टपणे बोलली आहे. हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना सुशांत सिंग राजपूतचे घर विकत घेतल्याच्या बातमीवर अदा म्हणाली, 'माझे घर मला मंदिरासारखे आहे, मी कुठे राहते याविषयी प्रत्येक वृत्तपत्र आणि फोनद्वारे याचा प्रचार व्हावा असं मला वाटत नाही. मी लहानपणापासून माझ्या वडिलांच्या घरी पल्लई येथे राहत आहे.

# धावांच्या शर्यतीत गोलंदाजांची कमाल!

## भारताची ऑस्ट्रेलियावर सरशी; दुसऱ्या ट्वेन्टी20 सामन्यात 44 धावांनी विजय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**प्रथम फलंदाजी करताना मोठी धावसंख्या उभारायची आणि नंतर त्या धावसंख्येचा यशस्वी बचाव हे सूत्र अवलंबत भारतीय संघाने तिरुवनंतपुरम इथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या ट्वेन्टी२० सामन्यात ४४ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतला पुढचा सामना गुवाहाटी इथे २८ तारखेला होणार आहे. भारताने २३५ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाने १९१ धावा केल्या.**






ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला खरा पण भारतीय फलंदाजांनी मनमुराद फटकेबाजी केली. यशस्वी जैस्वाल आणि ऋतुराज गायकवाड जोडीने सहाव्या षटकात ७७ धावांची सलामी दिली. जैस्वालने ९ चौकार आणि २ षटकारांसह २५ चेंडूत ५३ धावांची खेळी केली. यानंतर ऋतुराजला इशान किशनची साथ मिळाली. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ५८ चेंडूत ८७ धावांची भागीदारी केली. इशानने ३२ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५२ धावा चोपल्या. धडाकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध आणि या मालिकेसाठी कर्णधाराच्या भूमिकेत असणारा सूर्यकुमार यादव १९ धावा करुन तंबूत परतला. ऋतुराज गायकवाडने एक बाजू सांभाळत अर्धशतकी खेळी साकारली. त्याने ४३ चेंडूत ५८ धावांची खेळी केली. रिंकू सिंगने अवघ्या ९ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ३१ धावा केल्या आणि भारतीय संघाने ऑस्ट्रेलियासमोर २३६ धावांचं लक्ष्य ठेवलं. ऑस्ट्रेलियातर्फे नॅथन एलिसने ३ विकेट्स पटकावल्या.

प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाने मॅथ्यू शॉर्ट, जोश इंगलिस आणि ग्लेन मॅक्सवेल यांना झटपट गमावलं. पाठोपाठ स्टीव्हन स्मिथही तंबूत परतला. यानंतर मार्कस स्टॉइनस आणि टीम डेव्हिड यांनी ३८ चेंडूत ८१ धावांची शानदार भागीदारी रचली. रवी बिश्नोईने ही जोडी फोडली. डेव्हिडने ३७ धावांची खेळी केली. थोड्या अंतरात मुकेश कुमारच्या गोलंदाजीवर मार्कस स्टॉइनस बाद झाला. त्याने २५ चेंडूत ४५ धावांची खेळी केली. प्रसिध कृष्णाने शॉन अबॉटला त्रिफळाचीत केलं. यानंतर मॅथ्यू वेडचा ४२ धावांचा अपवाद वगळता बाकी फलंदाजांनी शरणागती पत्करली. भारतातर्फे प्रसिध कृष्णा आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी तीन विकेट्स पटकावल्या. अर्शदीप सिंग, मुकेश कुमार आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

### वर्ल्डकप गमावला पण विक्रमी प्रेक्षकसंख्या कमावली; भारतात ४२२ अब्ज मिनिटे पाहिला गेला टीव्ही

भारतातील २०२३ च्या पुरुषांच्या ODI विश्वचषकाने स्टेडियममधील उपस्थिती आणि प्रसारण दर्शकांचे विक्रम मोडीत काढले आहेत. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये २०१५ च्या विश्वचषकादरम्यान १,०१६,४२० प्रेक्षकांच्या मागील विक्रमाला मागे टाकून भारतातील मैदानांवर एकूण १,२५०,३०७ प्रेक्षकांनी ४८ सामने पाहिले, असे आयसीसीने म्हटले आहे. इंग्लंडमधील २०१९ विश्वचषक ७,५२,००० प्रेक्षकांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. डिस्ने स्टारने सांगितले की, भारतातील लीनियर टेलिव्हिजन प्रेक्षकसंख्या अर्ध्या अब्जाहून अधिक झाली असून, स्पर्धेच्या सहा आठवड्यांमध्ये वर्ल्ड कपसाठी ५१८ चाहत्यांनी स्पर्धेतील सामन्यांचा आनंद लुटला .

# हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सकडून खेळणार नाही

## मुंबई इंडियन्सकडून आर्चरला, कोलकाताचा शार्दुलला निरोप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० क्रिकेट चाहत्यांना आगामी इंडियन प्रीमियर लीगचे वेध लागले आहेत. अशातच आयपीएलच्या सर्व १० संघांनी आपल्याकडे कायम ठेवलेल्या (रिटेन केलेल्या) आणि संघातून मुक्त (रिलीज) केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. रिलीज केलेले खेळाडू आणि नवीन खेळाडूंसह जवळपास ५०० हून अधिक खेळाडूंचा लवकरच लिलाव होणार आहे.**

त्यानंतर सर्व संघ आयपीएल २०२४ साठी सज्ज होतील. दरम्यान, गुजरात टायटन्स या संघाने रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी पाहून अनेकांना धक्का बसला आहे. कारण गेल्या काही दिवसांपासून हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सकडून खेळणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. गुजरातचा संघ पांड्याला संघातून मुक्त करणार असून तो आता मुंबई इंडियन्सकडून खेळणार असल्याचं सांगितलं जात होतं. परंतु, या सगळ्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. कारण हार्दिक पांड्या आयपीएल २०२४ मध्येदेखील गुजरातकडूनच खेळताना दिसेल. मुंबई इंडियन्सने वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला रिलीज केलं आहे. जसप्रीत बुमराह आणि जोफ्रा आर्चर या दोघांना एकत्र खेळवून प्रतिस्पर्ध्यांची भंबेरी उडवण्याचा मुंबईचा विचार होता पण दोघांनाही दुखापतींनी सतावल्यामुळे हा विचार कागदावरच राहिला. आर्चर दुखापतीमुळे दोन वर्ल्डकप खेळू शकलेला नाही. अखेर मुंबईने आर्चरला रिलीज करण्याचा निर्णय घेतला आहे. आर्चरसह मुंबईने ट्रिस्टन स्टब्स, झाय रिचर्डसन, हृतिक शोकीन, ड्युआन यान्सन, रायली मेरिडिथ, ख्रिस जॉर्डन यांनाही



निरोप दिला आहे. महेंद्रसिंग धोनी, डेव्हॉन कॉनवे, ऋतुराज गायकवाड, अजिंक्य रहाणे, शाईक रशीद, रवींद्र जडेजा, मिचेल सँटनर, मोईन अली, शिवम दुबे, निशांत सिंधू, अजय मंडल, राजवर्धन हंगारगेकर, दीपक चहर, महेश तीक्षणा, मुकेश चौधरी, प्रशांत सोळंकी, सिमरजीत सिंग, तुषार देशपांडे, मथीशा पथिराणा

**चेन्नईने रिलीज केलेले प्लेयर्स**

बेन स्टोक्स, अंबाती रायुडू, ड्वेन प्रिटोरस, के. भगत वर्मा, शुभ्रांशू सेनापती, आकाश सिंग, कायले जेमिसन, सिसांदा मगाला.

**राजस्थानने रिटेन केलेले खेळाडू**

संजू सॅमसन, जोस बटलर, शिमोरन हेटमायर, यशस्वी जैस्वाल, ध्रुव जुरेल, रियान पराग, डोनाव्हन फरेरा, कुणाल राठोड, रवीचंद्रन अश्विन, कुलदीप सेन, नवदीप सैनी, प्रसिध कृष्णा, संदीप शर्मा, ट्रेंट बोल्ट, युझवेंद्र चहल, ॲडम झंपा, अवेश खान

**रिलीज केलेले खेळाडू**

जो रुट, ओबेड मेकॉय, जेसन होल्डर, अब्दुल बसिथ, आकाश वसिष्ठ, कुलदीप यादा, मुरुगन अश्विन, केसी करिअप्पा, के.एम. आसिफ

**दिल्लीने रिटेन केलेले खेळाडू**

ऋषभ पंत, डेव्हिड वॉर्नर, पृथ्वी शॉ, अभिषेक पोरेल, अक्षर पटेल, ललित यादव, मिचेल मार्श, यश धूल, प्रवीण दुबे, विकी ओत्सवाल, अँनरिक नॉर्किया, कुलदीप यादव, लुंगी एन्गिडी, खलील अहमद, इशांत शर्मा, मुकेश कुमार.

**रिलीज केलेले खेळाडू**

रायले रुसो, चेतन सकारिया, रोव्हमन पॉवेल, मनीष पांडे, फिल सॉल्ट, मुस्ताफिझूर रहमान, कमलेश नागरकोट्टी, रिपल पटेल, सर्फराझ खान, अमन खान, प्रियम गर्ग.

**कोलकाताने रिटेन केलेले खेळाडू**

श्रेयस अय्यर, नितीश राणा, रहमनुल्ला गुरबाझ, जेसन रॉय, सुनील नरिन, सुयश शर्मा, अनुकूल रॉय, आंद्रे रसेल, वेंकटेश अय्यर, हर्षित राणा, वैभव अरोरा, वरुण चक्रवर्ती.

**रिलीज केलेले खेळाडू**

शकीब अल हसन, लिट्टन दास, आर्या देसाई, डेव्हिड व्हिसे, नारायण जगदीशन, मनदीप सिंग, कुलवंत खेजरोलिया, शार्दूल ठाकूर, लॉकी फर्ग्युसन, उमेश यादव, टीम साऊदी, जॉन्सन चार्ल्स.

**सनरायझर्सने रिटेन केलेले खेळाडू**

एडन मारक्रम, अब्दुल समद, राहुल त्रिपाठी, ग्लेन फिलीप्स, हेनरिच क्लासन, मयांक अगरवाल, अनमोलप्रीत सिंग, उपेंद्रसिंग यादव, नितीश कुमार रेड्डी, शाहबाझ अहमद, अभिषेक शर्मा, मार्को यान्सन, वॉशिंग्टन सुंदर, सन्वीर सिंग, भुवनेश्वर कुमार, टी.नटराजन, मयांक मार्कंडेय, उम्रान मलिक, फझलक फरुकी

**रिलीज केलेले खेळाडू**

हॅरी ब्रूक, समर्थ व्यास, कार्तिक त्यागी, विव्रांत शर्मा, अकेल हुसैन, आदिल रशीद.